' जय सहकार '

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ (पूर्व), जि. ठाणे.

नोंदणी क्र. - टिएनूए / यु.एल.आर. / आर.एस.आर. / (सी.आर.) / ३७४ / ८९-९०

\- कार्यालय -

१९९४, श्री महालक्ष्मी मंदिराशेजारी, श्री महालक्ष्मीनगर,
अंबरनाथ (पूर्व), जि. ठाणे. पिन - ४२१ ५०१.

" शुभ चिंतावे शुभ इच्छावे वचनी शुभ बोलावे
शुभ कर्माच्या सामर्थ्याने करावे जीवनाचे सोने "

" सहकारात ऐपतीपेक्षा पतीला महत्व आहे "

स्थापना : २८ ऑगस्ट १९८९

सभासद संख्या	६७२
भाग भांडवल	५,१९,७७०
अधिकृत भाग भांडवल	१०,००,०००
बचत ठेवी	२,७०,०००
कर्ज वाटप	६,७९,२००
खेळते भांडवल	१०,३६,८६२
वार्षिक उलाढाल	११,२४,७६२.७५

४ था वार्षिक अहवाल

सन १९९२ - ९३

५०८०५७३८३१४३

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे.

- संचालक मंडळ -

श्री. जयवंतराव बंडू काटकर (विशेष कार्यकारी दंडाधिकारी)	अध्यक्ष
श्री. अनंतराव नारायण आंबरे (बी. ए.)	उपाध्यक्ष
श्री. हणमंतराव सदाशिव घनवट	चिटणीस
श्री. भिमराव यशवंतराव सुर्यवंशी (बी. कॉम.)	खजिनदार
श्री. सुभाष शामराव भावसार	संचालक
श्री. अविनाश नारायण खानविलकर	- " -
श्री. अशोक तुकाराम चौधरी	- " -
श्री. भालचंद्र यशवंतराव माने	- " -
श्री. प्रकाश शंकर पाटील	- " -
सौ. नलिनी कृष्णाजी यशवंतराव	- " -
श्री. संजय जगन्नाथ दरेकर	- " -
श्री. भगवान अर्जून उतेकर	- " -
श्री. हरिश्चंद्र यशवंत येरुणकर	- " -

- अंतर्गत हिशोब तपासनीस -

श्री. विलास रामचंद्र जगदाळे
बी. कॉम.

श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराव
बी. कॉम.

- अस्थायी कर्मचारी वर्ग -

रत्नलाल घनवट — केशव शं. दरेकर — नाथा लोटके

' जय सहकार '

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
अंबरनाथ, जि. ठाणे.

सन १९९२ - ९३ हिशोब तपासणी वर्ग 'अ'

- जाहीर नोटीस -

(फक्त सभासदांकरिता)

दिनांक - २० . ७ . ९३

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि. १३.८.९३ रोजी, दुपारी ४.०० वा. वेलफेअर सेंटर, वडवली सेक्शन, अंबरनाथ (पूर्व) येथे आयोजित केली आहे तरी सर्वांनी उपस्थित रहावे ही विनंती.

-: सभेपुढील कामे :-

१) मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) सन १९९२ - ९३ चा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.

३) सन १९९२ - ९३ च्या नफा विभागणीस मंजूरी देणे.

४) सन १९९३ - ९४ सालाकरिता अंतर्गत हिशोब तपासनिसांची निवड करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

५) पोटनियम दुरुस्तिबाबात विचार करणे.

६) सन १९९२ - ९३ चा वैधानिक हिशोब तपासनिसांचे अहवाल वाचन.

७) दैनंदिन व मासीक ठेवीबाबत चर्चा.

८) ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर मा. अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा करणे.

श्री. हणमंत सदाशिव धनवट

चिटणीस.

टिप -

१) सभासदांनी आपल्या सूचना अगर प्रश्न संस्थेच्या कार्यालयात दि. ८.८.९३ पर्यंत लेखी पाठवाव्यात.

२) सर्व सभासदांनी आपला अहवाल बरोबर आणावा.

३) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी त्याच विषयांवर सभेच्या कामकाजास सुरुवात होईल व त्यास गणपूर्तीचे बंधन रहाणार नाही.

४) सभेस उपस्थित रहाणाऱ्या सभासदास भेट वस्तू देण्यात येईल.

' विना सहकार नही उद्धार '

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ (पूर्व), जि. ठाणे.

- : चौथा वर्षिक अहवाल : सन १९९२ - ९३ :-

सन्माननीय सभासद बंधूभगिनिंनो,

सप्रेम नमस्कार वि. वि.,

जीवनात 'सह्कार' या शब्दाला अनन्यसाधारण असे महत्व आहे, अर्थ आहे आणि खरोखरच तो श्रेष्ठही आहे. कारण सहकाराशिवाय कोणताही समाज, गांव, राज्य आणि पर्यायाने देशसुद्धा प्रगती करु शक्त नाही. म्हणूनच ' विना सहकार नही उद्धार ' अशी उक्ती प्रचलित आहे आणि ती खऱ्या अर्थाने सार्थ आहे. तेंव्हा आपली, आपल्या देशाची प्रगती करावयाची असेल तर प्रत्येकाने आपल्यात, घरात, गावांत, राज्यात सहकाराची भावना रूजवली पाहिजे. तेंव्हाच आपण प्रगती करु शकू. आपली संस्था ही एक सहकाराचं रोपटं आहे, सहकाराची भावना, प्रेरणा देणारी एक शाळाच आहे.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने संस्थेचा ३१ मार्च १९९३ अखेरचा वार्षिक अहवाल, संस्थेची सांपतीक स्थिती दर्शविणारे ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रके आपल्या समोर ठेवतांना मला अत्यंत आनंद होत आहे. संस्थेने चालू सहकार वर्षात केलेली नेत्रदीपक प्रगती आणि जनमानसांत मिळविलेले मानाचे स्थान याची कल्पना देणे मी माझे कर्तव्य समजतो. त्याचबरोबर आपणा सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी आपले सर्वप्रथम स्वागत करतो.

सभासद, ठेवीदार, खातेदार, मार्गदर्शक आणि हितचिंतक यांनी केलेल्या निर्मेळ प्रेमामुळे आणि आशिर्वादाने आपण सर्वजण समाधानी आहोत याचा मला सार्थ अभिमान वाटतो. रहिवाशांमध्ये संस्थेचे सभासद होण्याबाबतची उत्सुकता पाहता संस्थेच्या संचालक मंडळाने केलेल्या प्रामाणिक व अथक परिश्रमांची पोचपावतीच आहे, असे मी मानतो.

संचालक मंडळाने अथक परिश्रमाने केलेली प्रगती खाली दर्शविलेल्या तक्त्यावरुन लक्षात येईल.

नं.	तपशील	१९८९-९०	१९९०-९१	१९९१-९२	१९९२-९३
१	सभासद	४६०	५९५	६८४	६७२
२	भागभांडवल	८७,३७०	२,३६,९३०	४,१८,४७०	५,१९,७७०
३	ठेवी	१,७५,५००	३,९०,५००	४,२३,५००	२,७७,०००
४	कर्ज	२,९६,५००	८,७५,३००	११,६९,०००	६,७९,२००
५	खेळते भांडवल	२,६९,८३९.५०	७,०५,३७४.५०	१०,५०,९५०.२५	१०,३६,८६२.००
६	दैनंदीन ठेवी	-	-	-	१६,१०५.००
७	मासीक ठेवी	-	-	-	१,२५०.००
८	नफा	५,२५१.५०	२१,१७८.००	७०,८०४.२५	९०,०४१.७५

ठेवी -

ठेवी हा संस्थेच्या प्रगतीचा पाया आहे, तो मजबूत ठेवण्यासाठी संचालक मंडळ नेहमी जागृत असते. अहवालसाली संस्थेकडे एकूण रुपये २,७७,०००/- ठेवींच्या रुपाने जमा आहेत.

कर्ज -

सभासदांच्या अडचणी लक्षांत घेऊन संचालक मंडळाने सभासदांना सुलभ हप्त्याने, विना विलंब कर्ज सहाय्य देण्याचे धोरण अवलंबीले आहे. सभासदांच्या गरजा भागवून त्याच्या कुटुंबियांचे जीवन सुखी, समृद्ध व संपन्न व्हावे ही सदिच्छा ठेवून संस्येने अहवालसाली एकूण रुपये ६,७९,२००/- चे कर्जवाटप केले आहे.

नफा -

अहवालसाली आपल्या संस्येस एकूण नफा रु. ९०,०४१.७५ एवढा झाला आहे. सोबत नफा विनियोग तक्ता जोडला आहे. त्यास आपण मंजूरी द्याल अशी आशा आहे.

सभा -

अहवालसाली संचालक मंडळाच्या एकूण ९ सभा झाल्या. त्याशिवाय दैनंदिन कामकाज आणि संस्थेच्या प्रगतिच्या दृष्टीने विचार विनिमय करण्यासाठी सायंकाळी ७ ते ९ या वेळात संस्थेचे पदाधिकारी आणि संचालक कार्यालयात हजर असतात.

पोटनियम दुरुस्ती -

संचालक मंडळआने पोटनियमांत काही दुरुस्ती सुचविल्या आहेत. त्याचा तपशील पुढे देत आहे; त्यास आपण सर्वांनी मंजूरी द्यावी ही विनंती.

श्रद्धांजली -

माजी नगराध्यक्ष श्री. दादासाहेब नलावडे यांच्या मातोश्री, लेखाधिकारी म.रा.वि.म. मुंबई, श्री. वसंतराव मोहिरे साहेबांच्या मातोश्री, श्री. गणपत वि. गोणबरे यांच्या पत्नी या व अशा ज्ञात, अज्ञातांच्या दुःखद निधनाबद्दल संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

आभार -

संस्थेस खालील मान्यवरांचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले त्याच्या या सहकार्याबद्दल ऋणनिर्देश व्यक्त करणे हे माझे कर्तव्यच ठरते -

मा. श्री. नकुल पाटील, अध्यक्ष, सिडको. मा. श्री. दादासाहेब नलावडे, माजी नगराध्यक्ष, अंबरनाथ. मा. श्री. साळवी साहेब सहाय्यक निबंधक, उल्हासनगर. मा. श्री. अस्वले साहेब, शाखाधिकारी, ठाणे जि. म. बँक, अंबरनाथ. मा. श्री. जी. एल. मोरे, अप्पर उपलेखा परीक्षक, सहकारी संस्था, कल्याण. मा. श्री. बाळासाहेब सोनजे, मुख्याध्यापक, म. गांधी विद्यालय, अंबरनाथ. मा. श्री. वसंतराव मोहिरे, लेखाधिकारी, म.रा.वि.म., मुंबई. मा. श्री. एस्. एस्. भगत, जनरल मॅनेजर, मेकॉन इंजिनियरींग. मा. श्री. कृष्णाजी रा. यशवंतराव, संस्थेचे अंतर्गत हिशोब तपासनीस. मा. श्री. विलास रा. जगदाळे, संस्थेचे अंतर्गत हिशोब तपासनीस

आपले आणि अनावधाने राहिलेल्या अन्यांचे लाभलेले मार्गदर्शन व अनमोल सहकार्याबद्दल हार्दिक आभार व अभिनंदन.

समारोप -

सहकारी क्षेत्रांमध्ये संस्थेचा उत्कर्ष हा तिच्या कर्जवसूलीवर अवलंबून असतो. आपल्या संस्थेची कर्जवसूली आजतागायत १०० % होत आली आहे. ती कायम राखण्यासाठी आपण सर्वच सभासद बंधु आणि भगिनी सहकार्य करित असता याचा अवर्जून उल्लेख करणे हे माझे संचालक मंडळाच्या वतीने आद्य कर्तव्य समजतो. ' इवलेसे रोप लावियले दारी । त्याचा वेलू गेला गगनावरी ' या अभंगात वर्णन केल्याप्रमाणे आपण या संस्थेच्या रुपाने एक रोपटे लावले आहे. आपण सर्वांनी अत्यंत कष्टाने त्याची जोपासना केली आहे. त्याला आपण खत-पाणी घालुया, त्याच्यावर निर्भेळ प्रेम करुया आणि या रोपट्याचे विशाल वटवृक्षात

रुपांतर करुया म्हणजेच सहकारी पतपेढीचे सहकारी बँकेत रुपांतर कसे होईल अशी जिद्द उराशी बाळगून नेटाने कामाला लागुया.

माननीय सभासद बंधुभगिनिंनो आपण आम्हा संचालक मंडळावर जो अमोल विश्वास दर्शविला आहे त्यास कोणत्याही प्रकारे गालबोट न लावता, आपला नितांत आदर बाळगून संस्थेचा कारभार जबाबदारीने, निःस्पृहतेने करु अशी ग्वाही देऊन संस्थेची आर्थिक स्थिती दर्शविणारा सन १९९२-९३ चा अहवाल, ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रके संचालक मंडळाचे वतीने मी आपल्यासमोर मंजुरीसाठी विनम्रतेने सादर करीत आहे. तरी त्यास आपणा सर्वांनी मंजूरी यावी ही विनंती.

धन्यवाद

जय हिंद - जय सहकार

श्री. जयवंत बंडू काटकर
अध्यक्ष
संचालक मंडळाच्या वतीने

सन १९९२ - ९३ चे नफा विभागणी पत्रक

अ.क्र.	तपशील		नफा विभागणी रक्कम	एकूण नफा रक्कम
१.	मागील शिल्लक नफा	३२६.६५		
२.	सन १९९२ - ९३ चा नफा	९०,०४१.७५		९०,३६८.४०
३.	२५ % राखीव निधी		२२,५१०.००	
४.	१० % लाभांश		३८,९८२.००	
५.	२ % लाभांश समीकरण निधी		१०,३९५.००	
६.	२० % इमारत निधी		३,६३०.००	
७.	१० % सभासद कल्याण निधी		१,८१५.००	
८.	१० % संशयीत बुडीत कर्ज निधी		१,८१५.००	
९.	२५ % धर्मदाय निधी		४,५३८.००	
१०.	रौप्य महोत्सव निधी		२,०००.००	
११.	शिल्लक नफा		४,६८६.४०	
	एकूण		९०,३६८.४०	९०,३६८.४०

श्री. भि. य. सुर्यवंशी
खजिनदार

श्री. ह. स. धनवट
सचिव

श्री. जयवंतराव बंडू काटकर
अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे.

नोंदणी क्र. - टिएनूए / यु.एल.आर. / आर.एस.आर. / (सी.आर.) / ३७४ / सन ८९ - ९०

तेरीज पत्रक नंबर - १

१ - ७ - १९९२ ते ३१ - ३ - १९९३ अखेरचे

जमा	रक्कम	नावे	रक्कम
आरंभीची शिल्लक - रोख	१,१३८ . १०	सभासद दिर्घमुदत कर्ज	६,७९,२०० . ००
- बँक	१४,१९४ . १५	राखीव निधि	७,३०० . ००
सभासद दिर्घ मुदत कर्ज	७,०८,१८५ . ००	मासिक / दैनंदिन ठेव कमिशन	२६५ . ००
सभासद कर्जावरील व्याज	१,७२,२८७ . ५०	सभासद कर्जव्याज परत	२३७ . ००
सभासद भाग	१,१५,८७० . ००	सभासद भाग परत	१४,५७० . ००
छपाई व लेखन साहित्य	१,८४८ . ००	छपाई व लेखन साहित्य	१०,९२१ . ५०
दैनंदिन ठेव	१६,४८५ . ००	किरकोळ खर्च	१,५४७ . २५
प्रवास खर्च	३० . ००	दैनंदिन ठेव	२,६८० . ००
प्रवेश फी	८ . ००	प्रवास खर्च	३८८ . ००
मुदत ठेव	७६,००० . ००	ऑडीट फी	२,०५१ . ००
बँक व्याज	२१ . ००	शिक्षण निधी	१,०५० . ००
बँक भाग लाभांश	१८ . ००	मुदत ठेव	२,२९,५०० . ००
टपाल खर्च वसुली	५० . ००	सचिव व मदतनीस मानधन	४,९२५ . ००
अनामत	३,४२५ . ००	अंतर्गत हिशोब तपासनीस फी	१,५०२ . ००
इमारत निधी	१२,७२८ . ००	कर्मचारी पगार	४७,७०० . ००
मासिक ठेव	१,४०० . ००	जाहिरात खाते	८८१ . ००
कायदेशिर सल्लागार फी जमा	४०० . ००	ऑफिस भाडे	९०० . ००
जाहिरात जमा	६७५ . ००	वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च	१,६२२ . ००
		संचालक सभा भत्ता	१,६३० . ००
		ठेवींवरील व्याज	६२,५५५ . ००
		टपाल खर्च	१६७ . ००
		अकौंटिंग चार्जेस	१,००० . ००
		अनामत	३,४२५ . ००
		लाभांश	२५,१७४ . ००
		कायदेशिर सल्लागार फी	८६८ . ००
		डेड स्टॉक	७८० . ००
		अखेरची शिल्लक - रोख	५०९ . ००
		- बँक	२२,२१५ . ००
एकुण	११,२४,७६२ . ७५	एकुण	११,२४,७६२ . ७५

श्री. भि. य. सुर्यवंशी	श्री. ह. स. घनवट	श्री. जयवंतराव बंडू काटकर
खजिनदार	सचिव	अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे.

नोंदणी क्र. - टिएनूए / यु.एल.आर. / आर.एस.आर. / (सी.आर.) / ३७४ / सन ८९ - ९०

उत्पन्न खर्च पत्रक नंबर - २

१ - ७ - १९९२ ते ३१ - ३ - १९९३ अखेरचे

खर्च तपशिल	रक्कम	उत्पन्न तपशिल	रक्कम
मासिक व दैनंदिन ठेव कमिशन	२६५ . ००	सभासद कर्जावरील व्याज	१,७२,२८७ . ५०
सभासद कर्ज व्याज परत	२३७ . ००	छपाई व लेखन साहित्य जमा	१,८४८ . ००
छपाई व स्टेशनरी	१०,९२१ . ५०	प्रवास खर्च जमा	३० . ००
किरकोळ खर्च	१,५४७ . २५	बँक व्याज	२१ . ००
प्रवास खर्च	३८८ . ००	बँक लाभांश	१८ . ००
सचीव व मदतनीस मानधन	४,१२५ . ००	टपाल खर्च वसुली	५० . ००
अंतर्गत हि. फी.	१,५०२ . ००	कायदेशीर सल्ला फी वसुली	४०० . ००
शासकीय हि. तपासणी फी देणे	२,०३७ . ००	जाहीरात खर्च जमा	६७५ . ००
शिक्षण निधी देणे	१,०३७ . ००		
कर्मचारी पगार	१८,९०० . ००		
देणे ठेवीवरील व्याज	३२,००५ . ००		
जाहीरात खर्च	८८१ . ००		
ऑफिस भाडे	९०० . ००		
वार्षिक सभा खर्च	१,६२२ . ००		
संचालक भत्ता नांवे	१,११० . ००		
देणे कर्मचारी बोनस	४,२०० . ००		
टपाल खर्च	१६७ . ००		
अकौंटींग खर्च	२,००० . ००		
कायदेशिर सल्ला फी	८६८ . ००		
डेड स्टॉक झीज	५७५ . ००		
चालू नफा	९०,०४१ . ७५		
नावे रुपये	१,७५,३२९ . ५०	जमा रुपये	१,७५,३२९ . ५०

श्री. भि. य. सुर्यवंशी	श्री. ह. स. घनवट	श्री. जयवंतराव बंडू काटकर
खजिनदार	सचिव	अध्यक्ष

सभासदांना सूचना

१) आपल्या पत्त्यात बदल झाल्यास तसा बदल संस्येस कळवावा, म्हणजे पत्रव्यवहारास सुलभ होईल.

२) सभासदास वारस नेमता येतो. ज्यांनी वारसाची नोंद केली नसेल त्यांनी रीतसर अर्ज करुन वारस नेमावेत व भविष्यातील अडचणी टाळाव्यात.

३) अपली पत आणि पतसंस्थेचा दर्जा वाढविण्यासाठी कर्जाचे हप्ते आणि भाग वर्गणी नियमीत भरून संस्थेस सहकार्य करा व त्याचा फायदा लाभांश रूपाने मिळवा.

४) पतपेढीचे काम सहकारी कायदा अधिनियम - नियम यांना अनुसरून करावे लागते. तेंव्हा आपल्या व्यवहारासंबंधीत काही अडचण असल्यास ती समजून घेऊन व्यवस्थापक मंडळास सहकार्य करा.

५) कर्ज घेण्यासाठी एकमेकांच्या विश्वासाने तिघांचे गट निर्माण करा व वरचे वर त्यात बदल करू नका.

६) पतपेढी कडून कर्ज मिळविणे हा उद्देश न ठेवता आपल्या मिळकतीतून बचत करा व ठेव ठेवा.

७) सभासद झाल्यापासून सहा महिन्यांनंतर सभासद कर्ज मागणीस व जामिन राहण्यास पात्र ठरेल.

८) कर्ज मंजूरी करिता दोन जामिनदारांची आवश्यकता राहील.

९) सभासद हा फक्त दोन कर्जदारांना जामिन राहू शकेल.

१०) कर्जाची परतफेड कमाल ३६ हप्त्यात करावी लागेल.

११) कर्ज घेते वेळी कर्जदार दोन्ही जामिनदारांसह प्रत्यक्ष हजर रहाणे आवश्यक आहे.

१२) कर्जाचे हप्ते व वर्गणी भरते वेळी आपले पासबुक सोबत आणावे व भरून घ्यावे.

- संस्थेची उद्दीष्टे -

१) सभासदांमध्ये प्रामाणिकपणा, काटकसर, स्वावलंबन व सहकाराची भावना रुजविणे.

२) सभासदांना त्यांच्या संकटकाळी, आपत्तीच्या काळात मदत करणे.

३) आपल्या सहकार्यातून सभासदांचे जीवनमान उंचावण्यास हातभार लावणे.

४) सभासदांमध्ये अल्पबचतीची सवय निर्माण करून भविष्यातील अडचणींवर मात करण्यास मदत करणे.

५) वाजवी शर्तिवर कर्ज मिळवून देण्यास मदत करणे.

६) वरील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी इतर कामे हाती घेणे.

- आवाहन -

प्रिय सभासद बंधु-भगिनिंना विनम्र आवाहन ! मी पतपेढीचा अध्यक्ष या नात्याने आपणा सर्वांना आवाहन करू इच्छीतो की, आपली ही विशाल उद्दीष्टे साध्य करावयाची असतील तर मोठ्या भांडवलाची आवश्यकता आहे. आपल्या गरजा भागविणे सोईचे व्हावे म्हणून आपण स्वतः, आपले मित्र व स्नेही यांचेकडून ठेवीद्वारे जास्तीत जास्त भांडवल उभारण्यासाठी आपल्या अनेक हातांच्या सहकार्याची अपेक्षा बाळगतो. ठेवींवर आकर्षक व्याज दिले जाईल. तरी माझ्या सभासद बंधु आणि भगिनिंनो आपण योग्य प्रतिसाद द्याल ही अपेक्षा.

जयहिंद

'विना सहकार नही उद्धार'

श्री. जयवंतराव बंडू काटकर

अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी

नोंदणी क्र. - टि. एन्. ए. / यु. एल. आर. / आर. एस. आर. /

ताळेबंद पत्रक नंबर ३

३० - ६ - ९२ रक्कम	कर्ज व देणे	रक्कम	३१ - ३ - ९३ रक्कम
५,००,००० . ००	अधिकृत भाग भांडवल	१०,००,००० . ००	१०,००,००० . ००
४,९८,४७० . ००	वसुल भाग भांडवल	-	५,१९,७०० . ००
७,३०५ . ००	राखीव निधी	७,३०५ . ००	२२,६१८ . ००
	अधिक प्रवेश फी	८ . ००	
	अधिक सन ९१ - ९२ मधील जमा	१५,३०५ . ००	
	इतर निधी		५०,७७३ . ००
४,२५० . ००	इमारत निधी	२९,२२३ . ००	
४५० . ००	लाभांश समिकरण निधी	१,६७५ . ००	
४५० . ००	धर्मादाय निधी	१,६७५ . ००	
७०० . ००	सभासद कल्याण निधी	२,७०० . ००	
१०,००० . ००	संशयित व बुडीत कर्ज निधी	१२,००० . ००	
५०० . ००	रौप्य महोत्सव निधी	३,५०० . ००	
	ठेवी		२,८७,३५५ . ००
४,२३,५०० . ००	मुदत ठेवी	२,७०,००० . ००	
२,१५० . ००	दैनिक ठेव	१५,९५५ . ००	
-	मासिक ठेव	१,४०० . ००	
	देणी व तरतुदी		६५,९७७ . ६०
२,०५१ . ००	देणे ऑडीट फी	२,०३७ . ००	
१,०५० . ००	देणे शिक्षण निधी	१,०३७ . ००	
७९,९५० . ००	देणे ठेवीवरील व्याज	४९,४०० . ००	
-	देणे आर्कोटींग चार्जेस	१,००० . ००	
२८,८०० . ००	देणे पगार	-	
-	देणे लाभांश	८,३०३ . ६०	
-	कर्मचारी बोनस देणे	४,२०० . ००	
५२० . ००	संचालक भत्ता देणे	-	
	नफा तोटा खाते		
९,५८६ . ५०	मागील शिल्लक नफा	३२६ . ६५	
६१,२९७ . ७५	चालू नफा	१०,०४१ . ७५	१०,३६८ . ४०
१०,५०,९५० . २५	एकूण रुपये		१०,३६,८६२ . ००

श्री. भि. य. सुर्यवंशी
खजिनदार

श्री. ह. स. घनवट
सचिव

पतपेढी मर्यादीत, अंबरनाथ, जिल्हा - ठाणे.

(सी. आर.) / ३७४ / सन १९८९ - ९०

तारीख ३१ - ३ १९९३ अखेर

३० - ६ - ९२ रक्कम	जिंदगी व येणी	रक्कम	३१ - ३ - ९३ रक्कम
१,१३८ . १०	रोख शिल्लक		५०९ . ००
१४,११४ . १५	ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक शिल्लक		२२,२१५ . ००
	गुंतवणुक		७,४०० . ००
१०० . ००	ठाणे जिल्हा मध्य. बँक शेअर्स	१०० . ००	
-	ठाणे जिल्हा मध्य. बँक राखीव ठेव निधी	७,३०० . ००	
१०,३०,५५० . ००	सभासद दिर्घ मुदत कर्ज		१०,०१,५६५ . ००
४,९६८ . ००	डेड स्टॉक		५,१७३ . ००
	मागील डेड स्टॉक	४,९६८ . ००	
	अधिक खरेदी	७८० . ००	
		५,७४८ . ००	
	वजा १० % झीज	५७५ . ००	
१०,५०,९५० . २५	एकूण रुपये		१०,३६,८६२ . ००

श्री. जयवंतराव बंडू काटकर
चेअरमन

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे.

नोंदणी क्र. - टिएनए / यु.एल.आर. / आर.एस.आर. / (सी.आर.) / ३७४ / सन ८९ - ९०

सन १९९३ - ९४ चा

उत्पन्न व खर्चाचा अर्थसंकल्प

(ता. १ - ४ ९३ ते ३१ - ३ - ९४ पर्यंत)

जमा तपशिल	सन १९९२ - ९३ चे उत्पन्न	सन १९९३ - ९४ चे अंदाजे उत्पन्न	खर्च तपशिल	सन १९९२ - ९३ प्रत्यक्ष खर्च	सन १९९२ - ९३ चा अंदाजे खर्च
सभासद कर्जावरील व्याज	१,७२,२८७ . ५०	२,००,००० . ००	छपाई व लेखन सामुग्री	१०,९२१ . ००	१४,००० . ००
प्रवेश फी	८ . ००	५० . ००	किरकोळ खर्च	१,५४७ . २५	२,००० . ००
बँक लाभांश	१८ . ००	१० . ००	प्रवास खर्च	३८८ . ००	५०० . ००
बँक व्याज	२१ . ००	३० . ००	टपाल खर्च	१६७ . ००	२०० . ००
			सभा खर्च	१,६२२ . ००	३,००० . ००
			संचालक समाभत्ता	१,११० . ००	१,५०० . ००
			ऑडीट फी	२,०३७ . ००	२,०३७ . ००
			शिक्षण निधी	१,०३७ . ००	१,०३७ . ००
			मदतनिस व स. मानधन	४,१२५ . ००	६,००० . ००
			अंतर्गत हिशेब त. फी	१,००२ . ००	२,००० . ००
			जाहिरात खर्च	८८१ . ००	१,००० . ००
			ठेवीवरील व्याज	६२,५५५ . ००	४५,००० . ००
			ऑफीस भाडे	९०० . ००	२,४०० . ००
			अस्थाई कर्मचारी वेतन	१८,९०० . ००	२५,२०० . ००
			भाग परत	१४,५७० . ००	१५,००० . ००
			नफा	५०,५७१ . ७५	७९,२१६ . ००
	१,७२,३३४ . ५०	२,००,०९० . ००		१,७२,३३४ . ५०	२,००,०९० . ००

पोट नियम दुरुस्ती

पोट नियम क्र.	सध्याचे नियम	पोट नियम दुरुस्ती	दुरुस्तीची कारणे
ह. १८	वार्षिक साधारण सभेत अगर विशेष साधारण सभेत निवडून आलेल्या १३ सदस्यांची व्यवस्थापक समिती बनेल. पैकी १ सदस्य अनुसुचित जाती/ जमाती व १ सदस्य की, जो आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या गटातील सदस्यामधून असावा. अशी व्यवस्थापक समिती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, खजिनदार व समिती सदस्य, निवडून आलेल्या सदस्यातून निवडेल. व्यवस्थापक समितीची गणसंख्या (Quorum) सात राहील.	वार्षिक साधारण सभेत अगर विशेष साधारण सभेत निवडून आलेल्या १३ सदस्यांची व्यवस्थापक समिती बनेल. पैकी १ सदस्य अनुसुचित जाती/ जमाती व १ सदस्य की, जो आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या गटातील सदस्यामधून असावा, दोन महिला सदस्य असाव्यात अशी व्यवस्थापक समिती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, खजिनदार व समिती सदस्य, निवडून आलेल्या सदस्यातून निवडेल. व्यवस्थापक समितीची गणसंख्या (Quorum) सात राहील.	शासन परिपत्रकानुसार
	संचालक मंडळाची मुदत ५ वर्षे (सहकारी वर्ष) राहील. संचालक मंडळाची निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेतली पाहिजे. संचालक मंडळाच्या निवडणूकीस पुरेसे अर्ज न आल्यास साधारण सभेत निवड करावी. निवड न झाल्यास तसे उपनिबंधकांना विद्यमान चेअरमन, सेक्रेटरी यांनी कळविले पाहिजे. व त्यांच्या सूचनेनुसार व्यवस्था केली पाहिजे.	संचालक मंडळाची मुदत ५ वर्षे (सहकारी वर्ष) राहील. संचालक मंडळाची निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेतली पाहिजे. संचालक मंडळाच्या निवडणूकीस पुरेसे अर्ज न आल्यास साधारण सभेत निवड करावी. निवड न झाल्यास तसे उपनिबंधकांना विद्यमान चेअरमन, सेक्रेटरी यांनी कळविले पाहिजे. व त्यांच्या सूचनेनुसार व्यवस्था केली पाहिजे.	
	कलम ७३-अ प्रमाणे सलग १० वर्षापेक्षा अधिक काळ पदाधिकारी म्हणून राहता येणार नाही; व पुन्हा पदाधिकारी होण्यापूर्वी ५ वर्षांचा कालावधी असावा. ही अट निर्दिष्ट सहकारी संस्थांसाठी लागू होईल.	कलम ७३-अ प्रमाणे सलग १० वर्षापेक्षा अधिक काळ पदाधिकारी म्हणून राहता येणार नाही; व पुन्हा पदाधिकारी होण्यापूर्वी ५ वर्षांचा कालावधी असावा. ही अट निर्दिष्ट सहकारी संस्थांसाठी लागू होईल.	
	पोटनियम व साधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावाच्या (तरतूदींच्या) उपबंधास अधीन राहून, संस्थेचे कामकाज चालविण्याचा पूर्ण अधिकार व्यवस्थापक समितीस राहील. संस्थेच्या कामकाजासाठी व्यवस्थापक समितीची सभा महिन्यातून एकदा भरविली पाहिजे. संचालक मंडळाच्या सभेस उपस्थित असलेल्या संचालकांना फक्त महिन्यातून एक वेळा मिटिंग भत्ता रु. १०/- घेता येईल.	पोटनियम व साधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावाच्या (तरतूदींच्या) उपबंधास अधीन राहून, संस्थेचे कामकाज चालविण्याचा पूर्ण अधिकार व्यवस्थापक समितीस राहील. संस्थेच्या कामकाजासाठी व्यवस्थापक समितीची सभा महिन्यातून एकदा भरविली पाहिजे. संचालक मंडळाच्या सभेस उपस्थित असलेल्या संचालकांना फक्त महिन्यातून एक वेळा मिटिंग भत्ता रु. २०/- घेता येईल.	वाढत्या महागाईमुळे

सहकारी लेखा परिक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ (५ ब) आणि
महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

मी, श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित या संस्थेचा सोबत जोडलेला ३१.३.९३ या दिनांकाचा ताळेबंद व सन १९९२-९३ या सहकारी वर्षाचे नफा-तोटा पत्रक तपासले असून अहवाल करितो की,

१) माझ्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी, माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे / माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खालील प्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासा मला उपलब्ध झाले आहेत.

२) माझ्या मते व मला मिळालेल्या माहिती व खुलाश्याचे आधारे,

अ) ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकांशी जुळते असून सदर ३१.३.९३ या दिनांकाचा ताळेबंद संस्थेच्या व्यवहाराची (कामकाजाची) सत्य व वास्तविक स्थिती दर्शवितो आणि नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची सत्य व वास्त व स्थिती दर्शवितो.

ब) संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिप्पणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायद्यानुसार अवश्यक ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितात.

३) माझ्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा, नियम व संस्थेचे पोटनियम यानुसार अवश्यक असणारी हिशोबी पुस्तके योग्य रितीने ठेवली आहेत.

४). सन १९९२ - ९३ या सहकारी वर्षासाठी संस्थेस लेखापरिक्षण वर्ग 'अ' देण्यात आला आहे.

ठिकाण : अंबरनाथ
दिनांक : १५.७.१९९३

जी. एल. मोरे
(अप्पर उपलेखा परिक्षक सहकारी संस्था, कल्याण.)

वार्षिक अहवालाचा कालावधी	:	सन १९९२ - ९३
संस्थेचे कार्यक्षेत्र	:	अंबरनाथ शहर मर्यादित
संस्थेच्या शाखा	:	कोठेही नाही.
सभासद	:	फक्त रीतसर व्यक्तिगत सभासदांची नोंदणी केली आहे.
भागभांडवल	:	संस्थेचे भागभांडवल फक्त वैयक्तिक सभासदांनी उभारले आहे.
कर्ज	:	कर्ज देणाऱ्या कोणत्याही संस्थेकडून कर्ज घेतले नाही.